जिल्हा परिषद, बीड

(सामान्य प्रशासन विभाग)

फोन नं. 02442-222342 ई-मेल आयडी dyceobeedgad@gmail.com

क्र.साप्रवि/आस्था-9/अनुकंपा/कावि-/ /2025 दिनांक - 01/10/2025

No 03919 01 OCT 2025

**प्रति,**

श्री./ श्रीमती --------------

अ.क्रं. 101 ते 218

**विषय :- दिनांक 06/10/2025 रोजी अनुकंपा तत्वावरील गट-क मधुन गट-ड (गट बदलने) मेळावा आयोजित करणे बाबत.**

**संदर्भ :- 1)महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.17 जुलै,2025**
**2)महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि.31 जुलै,2025**
**3)महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि.22ऑगस्ट,2025**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय 1 व 2 नुसार अनुकंपा तत्वावरील गट क च्या प्रतिक्षा यादवरील उमेदवारांना गट -ड च्या प्रतिक्षा यादीवर विकल्प देऊन समावेश करण्याबाबत तरतुद आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद,बीड अंतर्गत प्रसिध्द झालेल्या दि.31/12/2024 अखेरच्या अनुकंपा तत्वावरील गट-क च्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना गट-ड च्या प्रतिक्षा यादीवर समावेश करण्याकरीता विकल्प देण्याकरीता उमेदवारांचा मेळावा तथा समुपदेशन घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने **दिनांक 06/10/2025 रोजी वार सोमवार** रोजी **सकाळी ठिक 11.00 वाजता नुतन इमारत, जिल्हा परिषद बीड** येथे अनुकंपा तत्वावरील **गट-क मधुन गट-ड (गट बदलने)** बाबत मेळावा तथा समुपदेशन आयोजित करण्यात आलेले आहे.

तरी आपण दि.06.10.2025 रोजी सकाळी 11.00 वाजता नूतन इमारत जि.प.बीड येथे वेळेवर उपस्थित राहावे. सदरील मेळावा तथा समुपदेशनास उपस्थित न राहिल्यास आपण त्यानंतर केलेली कोणतेही विनंती मान्य केली जाणार नाही. संदर्भीय शासन निर्णयानुसार सदर समुपदेशन प्रक्रिया पार पाडणार आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(प्रदिप काकडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद, बीड

प्रतिलिपी :- 1) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.

(स्वा)
(प्रदिप काकडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद, बीड